## येडशी-लातूर महामार्ग तेरणा नदीवर पुलाची उंची वाढवून शेतकऱ्यांचे पाटपाणी जाण्यासाठी जलवाहिनी टाकण्याची मागणी

धाराशिव : येडशी-लातूर होऊ घातलेल्या महामार्गावरील तेरणा नदीवरील पुलाची उंची वाढविण्यात यावी, तसेच शेतकऱ्यांचे पाटपाणी जाण्यासाठी पाईपलाईन टाकावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. इस्लामपूर (जि. सांगली) येथे भेट घेऊन ही मागणी करण्यात आली, तसेच यावेळी येडशी-लातूर महामार्ग कामास मंजुरी दिल्याबद्दल दुधगावकर यांनी त्यांचे आभार मानले. याबाबत मंत्री गडकरी यांना दिलेल्या निवेदनात दुधगावकर यांनी म्हटले आहे की, येडशी-लातूर होऊ घातलेल्या महामार्गावरील जवळा दुमाले ते दुधगाव या दरम्यान तेरणा नदी वाहते आहे. या गावांना आपल्या विभागामार्फत प्रसिद्ध झालेला नवीन निविदेच्या कामांमध्ये तेरणा नदीवरील पुलाची उंची दहा फूट वाढविण्यात यावी. तसेच या महामार्गावरील जवळा दुमाले ते दुधगाव यादरम्यान तेरणा नदीपासून पुढे अर्धा किलोमीटर अंतरावर सौंदना रस्ता असून, सौंदना, शेलगाव, जवळा, खामगाव, वाघोली तेथील शेतकऱ्यांना येण्या-जाण्यासाठी रस्ता देण्यात यावा. त्याचप्रमाणे शेतातील पाटपाणी जाण्या-येण्यासाठी छोट्या पुलाची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. तरी वरील मार्गाचे काम चालू होण्याअगोदर संबंधितांना शेतकऱ्यांच्या या अडचणी दूर करण्यासंदर्भात आदेशित करावे, अशी मागणी दुधगावकर यांनी या निवेदनात केली आहे.


# अभ्युदय को–ऑप. बँक लि.

**(मल्टी स्टेट शेडयुल्ड बँक)**

**पुणे क्षेत्रीय कार्यालय : १ ला मजला, धनवंत प्लाझा, ५९८, बुधवार पेठ, पुणे–४११००२.**

**फोन : ०२०–२४४९११११९, २४४९१०९८, फॅक्स : ०२०–२४४९३४७८, ई–मेल : dgmpune@abhyudayabank.net**

## विक्री नोटीस

**दि सिक्युरिटायझेशन अँड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ८ आणि ९ अंतर्गत बँकेच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या मालमत्तेची विक्री**

पुढे नमूद करण्यात आलेल्या बँकेच्या **प्रत्यक्ष ताब्यात** असलेल्या मालमत्तांची विक्री **'जशी आहे जेथे आहे'** आणि **'जे आहे' 'जसे आहे'** आणि **'तेथे जे आहे ते'** आणि कोणत्याही फेरविचाराविना या तत्त्वावर, बँकेचे सुरक्षित कर्ज, व्याज, खर्च इत्यादी रक्कम कर्जदार / जामीनदार यांच्याकडून खाली नमूद केल्याप्रमाणे विक्री करण्याकरिता खाली सही करणार यांच्याकडे **दि. १२/०३/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा प्रकारे बंद लिफाफ्यातील प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | येणे रक्कम | मालमत्तेचे वर्णन आणि क्षेत्र | ताब्याचा प्रकार/ राखीव किंमत रूपये | बयाणा रक्कम रूपये | लिलावाची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. ग्लोबल अॅग्रो इंडस्ट्रीज् | रू. २१८.३४ लाख + त्यावरील दि. ०१/०२/२०२५ पासूनचे व्याज | १) औद्योगिक प्लॉट नं. ए/३०, ३१, आष्टी, एमआयडीसी, तालुका आष्टी, जिल्हा बीड, क्षेत्रफळ ३९७० चौ. मी. | रू. २,६८,३१,०००/– | रू. २६,८३,१००/– | १३/०३/२०२५ सकाळी ११.०० वा. |
| | | | २) मशीनरी | रू. १५,०५,०००/– + जीएसटी (लागू केलेले) | रू. १,५०,५००/– | |

निविदा अर्ज आणि मालमत्तेच्या विक्रीच्या अटी व शर्ती वसुली विभागाकडून, वर नमूद पत्त्यावर, कोणत्याही कामकाजाच्या दिवशी **सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.००** दरम्यान रु. ५००/– + GST लागू (विना परतावा) भरल्यानंतर मिळू शकतो. प्रस्तावासोबत **अभ्युदय को–ऑप. बँक लि.** यांच्या नावे काढलेला आणि **पुणे** येथे देय असलेला आणि जर प्रस्ताव स्वीकारण्यात आला नाही तर विनाव्याज परत करण्यात येईल असा सदर बयाणा रक्कमेचा बँक ड्राफ्ट / पे ऑर्डर जोडणे आवश्यक आहे. (बयाणा रक्कम आरटीजीएस द्वाराही जमा करता येईल). प्रस्ताव खाली सही करणार यांच्याकडून **अभ्युदय को–ऑप. बँक लि., १ ला मजला, धनवंत प्लाझा, ५९८, बुधवार पेठ, पुणे–४११००२** या ठिकाणी **दि. १३/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून** पुढे उघडण्यात येतील. त्याच ठिकाणी खुल्या लिलावाची प्रक्रिया सुध्दा करण्यात येईल. प्रस्तावकांना या ठिकाणी हजर राहता येईल आणि आपली वाढीव बोली बोलता येईल. यशस्वी प्रस्तावक / बोलीदार यांनी प्रस्तावाची २५% रक्कम (१०% बयाणा) बोली संपल्यानंतर त्याच दिवशी किंवा कामाच्या पुढील दिवसांच्या आधी आणि उर्वरित ७५% रक्कम १५ दिवसांच्या आत किंवा लिलाव घेणारे आणि बँक यांच्या दरम्यान लेखी स्वरूपात ठरलेल्या वाढीव मुदतीत जमा करणे आवश्यक आहे. त्यात कसूर / हयगय झाल्यास प्रस्तावकाने जमा केलेली संपूर्ण रक्कम बँक पुढे कोणतीही सूचना न देता जप्त करील. वैधानिक आणि अन्य देणी जर देय असतील तर खरेदीदाराने निश्चित करून भरावयाची आहेत. इच्छुक खरेदीदारांना वरील मालमत्तांची पाहणी **दि. ०७/०३/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ५.००** या दरम्यान करता येईल. कोणतेही कारण न देता कोणताही किंवा आलेले सर्व प्रस्ताव नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

**ज्योती जे. दुराफे, प्राधिकृत अधिकारी,**
**अभ्युदय को–ऑप. बँक लि.**

**दिनांक : २१/०२/२०२५, स्थळ : पुणे**